**BPV**

**2007**

100009

**मराठी वाङ्मय - II ( वैकल्पिक )**

**स्तर : पदवी** | **एकूण गुण : 200**

**स्वरूप : पारंपारिक** | **कालावधी : 3 तास**

**सूचना :**

*(i)* *सर्व प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहावीत.*

*(ii)* *प्रश्न क्रमांक 1 **हा अनिवार्य आहे.** उर्वरित प्रश्नांपैकी प्रत्येक विभागातून एक, याप्रमाणे चार प्रश्न सोडवा.*

*(iii)* *प्रश्नाच्या उजवीकडील अंक त्या प्रश्नाचे गुण दर्शवितात.*

*(iv)* *ज्या क्रमाने निर्धारित संख्येपर्यंत पर्यायी प्रश्नसंख्या सोडविली आहे, तेवढीच प्रश्नसंख्या तपासली जाईल, अतिरिक्त उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

*(v)* *तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास जास्त गुण देण्यात येतील.*

*(vi)* *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत: किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

*(vii)* *प्रत्येकी 10, 15 आणि 20 गुण असलेल्या प्रश्नांची उत्तरे परिक्षार्थीकडून अनुक्रमे 125, 175 आणि 250 शब्दांमध्ये अपेक्षित आहेत.*

**1.** खालीलपैकी **कोणतेही चार** प्रश्न सोडवा.

(अ) 'ययाति' या कादंबरीची मुख्य वैशिष्टे नोंदवा. **10**

(ब) 'दृष्टान्त पाठा' चे रचनाविशेष सांगा. **10**

(क) 'ज्ञानेशांच्या अमृतवाणी' च्या आधारे ज्ञानदेवांची आध्यात्मिक भूमिका थोडक्यात विशद करा. **10**

(ड) 'मृदगंध' मधील 'धोंड्या न्हावी' या कवितेचे रसग्रहण करा. **10**

(इ) 'नक्षत्रांचे देणे' या काव्यसंग्रहातील कवितांची काव्यात्म गुणवैशिष्टे सोदाहरण सांगा. **10**

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग – अ

2. पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) 'सबळ दुर्बळांमधील संघर्ष 'पाचोळा' या कादंबरीतून साकार झाला आहे' — चिकित्सा करा. 10

(ब) विशिष्ट काळातील मध्यमवर्गीयांचे किडलेपण 'किडलेली माणसे' या कथासंग्रहातून कसे साकार झाले आहे? 15

(क) 'ऋतुचक्र' या ललितलेखनाचे महत्त्वाचे विशेष सांगा. 15

3. पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) 'ययाति' या कादंबरीतील 'कच' व 'देवयानी' या पात्रांचे कथात्म कार्य सोदाहरण स्पष्ट करा. 10

(ब) मानवी जीवनाचे नवे आकलन 'परिव्राजक' मधील कथांमधून कसे व्यक्त झाले आहे? 15

(क) 'स्मृतिशेष' या ललितलेखनाची महत्वाची वैशिष्टे सांगा. 15

www.mpscmaterial.com

## विभाग – ब

4. पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) 'स्त्री–पुरुष' आणि 'जातिभेद' यांबद्दल म. ज्योतीराव फुले यांनी कोणते विचार मांडले आहेत ते सांगा. 10

(ब) 'मीच हे सांगितलं पाहिजे', हे शीलवती केतकरांचे आत्मचरित्र व श्री. व्यं. केतकरांचे चरित्र आहे. — साधार स्पष्ट करा. 15

(क) 'हिमालयाची सावली' मधील नाट्य संघर्षाचे स्वरूप सांगा. 15

5. पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) 'दृष्टान्तपाठा' तून यादवकालीन कोणकोणते सामाजिक संदर्भ व्यक्त झाले आहेत? 10

(ब) 'समकालीनता' हे 'माझा प्रवास' या ग्रंथाचे अंगभूत वेगळेपण आहे. — साधार लिहा. 15

(क) 'किरवंत' या नाटकातून उच्चवर्णीयांमधील अस्पृश्यतेचे दर्शन ठळकपणे घडते. — चर्चा करा. 15

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग – क

6. पुढील टिपा लिहा.

(अ) 'भोगासक्त कर्मठ' आणि 'अज्ञानी भक्त' यांच्यावरील ज्ञानदेवांचे भाष्य. 15

(ब) मर्ढेकरांच्या 'काही कविता' मधून मानवी जीवनातील दु:ख व यातना यांची येणारी प्रतीती. 10

(क) कुसुमाग्रजांच्या 'रसयात्रा' काव्यसंग्रहातील कवितांमधून प्रकटणारे जीवनभान. 15

7. पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) 'पैंजण' मधील शाहीरी रचनांमधून ऐतिहासिक घटनांचे दर्शन कसे घडते ते कोणत्याही दोन शाहीरांच्या रचनाधारे स्पष्ट करा. 15

(ब) 'मृद्‌गंध' मधील 'यंत्रावतार' या कवितेचे रसग्रहण करा. 10

(क) 'निसर्ग' आणि 'प्रेमभावना' यांचे ऐक्य 'रानातल्या कविता' तून कसे घडते ते सांगा. 15

## विभाग – ड

8. पुढील टिपा लिहा.

(अ) 'नक्षत्रांचे देणे' मधील कवितांतून प्रकटलेले मृत्युविषयक चिंतन. 10

(ब) बहिणाबाईंच्या कवितांतून साकारलेले ग्रामीण–स्त्रीजीवन. 15

(क) 'ब्रोकनमेन' या काव्यसंग्रहातील प्रतिमासृष्टीचे स्वरूप. 15

9. पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) 'सुर्वे यांच्या कवितेतील जग उपेक्षित समाजाचे व कामगारवर्गाचे आहे'
— 'निवडक नारायण सुर्वे' च्या आधारे लिहा. 10

(ब) फ.मु. शिंदे यांच्या 'सूर्यमुद्रा' काव्यसंग्रहाचे मर्मग्राही परीक्षण करा. 15

(क) 'फिर्याद' या काव्यसंग्रहातील 'दु:खाने गदगदलेल्या झाडाला पाहून' या कवितेचे रसग्रहण करा. 15

-oOo-

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

www.mpscmaterial.com

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial